**<u>ठळक बातम्या</u>**

- राम मंदिर देणगी अपहार प्रकरण आणि विद्यार्थी आंदोलनावर पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून गदारोळ झाल्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब

- अग्नी-४ या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

- राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त देशातल्या २२ कारागीरांना राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

**आणि**

- कोरिया बॅडमिंटन मास्टर्स स्पर्धेत भारताच्या रक्षिता रामराज आणि अश्मिता चालिहा यांची महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

राम मंदिर देणगी अपहार प्रकरण आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांच्या कारवाईच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा सभापती ओम बिरला यांनी येत्या ९ तारखेला भारत छोडो आंदोलनाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्धापन दिनाचा उल्लेख केला. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना सभागृहातल्या उपस्थितांनी दोन मिनिटं मौन पाळून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. तेव्हा विरोधी पक्ष सदस्यांनी राम मंदिर देणगी अपहार आणि आंदोलक विद्यार्थ्यांवरच्या पोलिसांच्या कारवाईवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी निवेदन द्यावं या मागणीवरून घोषणाबाजी सुरू केली. त्यावर सभागृहाचं कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन बिरला यांनी केलं. मात्र, गदारोळ सुरूच

राहिल्यानं त्यांनी सभागृहाचं कामकाज आधी दुपारी १२ आणि नंतर सोमवारपर्यंत तहकूब केलं.

याच मुद्द्यावरून राज्यसभेत झालेल्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाजही सोमवारपर्यंत तहकूब झालं. सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांनी भारत छोडो आंदोलनाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्धापनदिनानिमित्त स्वातंत्र्य लढ्यातल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. सभागृहातल्या उपस्थितांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान देणारे स्वातंत्र्यसैनिक आणि हुतात्मे यांना दोन मिनिटं मौन पाळून श्रद्धांजली वाहिली. यानंतर संरक्षण, गृह मंत्रालय, वाणिज्य, आरोग्य आणि कुटुंब कल्याण या विभागांशी संबंधित संसदीय स्थायी समित्यांचे अहवाल सभागृहात सादर करण्यात आले. त्यानंतर, विरोधकांच्या गदारोळातच अध्यक्षांनी शून्य प्रहराची घोषणा केली. मात्र, गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज आधी दुपारी १२ आणि नंतर सोमवारपर्यंत तहकूब झालं.

<><><><><>

गेल्या काही वर्षांत राबवण्यात आलेल्या विविध सुरक्षा उपाययोजनांमुळे रेल्वे अपघातांची संख्या लक्षणीयरित्या घटल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. गेल्या पाच आर्थिक वर्षांत रेल्वे सुरक्षिततेशी संबंधित कामांवर पाच लाख ४१ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आली. परिणामी रेल्वे अपघातांची संख्या २०१४-१५मध्ये १३५वरून कमी होऊन २०२६-२७मध्ये फक्त दोन इतकी नोंदवली गेल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

बदलत्या काळानुसार शिक्षण क्षेत्रातही बदल घडणं आवश्यक असून त्यातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्याचं आवाहन केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केलं आहे. ब्रिक्स देशांच्या शिक्षण

मंत्र्यांची परिषद आज भुवनेश्वर इथं भरली आहे. त्यात ते बोलत होते. भारत ब्रिक्स परिषदेचं अध्यक्षपद भूषवत असताना मजबुती, नवोन्मेष, आणि शाश्वतता, या त्रिसूत्रीवर मार्गक्रमण करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

झारखंडमधे स्पर्धापरीक्षा गैरप्रकाराचे आरोप करत विद्यार्थ्यांना पुकारलेल्या आंदोलनाचा आज १४ वा दिवस आहे. रांची इथं सहा आंदोलकांचं उपोषण सुरू आहे. मात्र राज्य सरकारकडून चर्चेसाठी अजून निमंत्रण मिळालं नसल्याचा दावा विद्यार्थी आंदोलकांनी काल केला. या आंदोलनाचे पडसाद काल झारखंड विधानसभेतही उमटले.अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानसभेच्या आवारात घोषणाबाजी केली. तर आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी सरकारचे दरवाजे खुले असल्याचं मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सांगितलं आहे. दरम्यान झारखंड सरकारनं १३ ऑगस्टपर्यंत पेपरफुटी आणि भरती प्रक्रियेतील अनियमिततेबाबत कोणताही निर्णय घेतला नाही, तर विद्यार्थ्यांच्या उपोषणात सहभागी होण्याचा इशारा भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी दिला आहे.

<><><><>

अग्नी-४ या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी काल घेण्यात आली. ओडिशातल्या चंदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रातून या क्षेपणास्त्राचं प्रक्षेपण झालं. ही यशस्वी प्रक्षेपण चाचणी देशाच्या सामरिक क्षमता मजबूत करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचा टप्पा आहे, असं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या यशस्वी मोहिमेबद्दल स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि डीआरडीओचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अभिनंदन केलं आहे.

<><><><>

बारावा राष्ट्रीय हातमाग दिवस आज देशभरात साजरा होत आहे. ७ ऑगस्ट १९०५ रोजी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा एक भाग म्हणून स्वदेशी चळवळ सुरू

करण्यात आली. त्याची आठवण म्हणून दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिवस म्हणून साजरा होतो. या निमित्ताने वस्त्रोद्योग मंत्रालयाने राष्ट्रपती भवनात आज विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात देशभरातल्या २२ हातमाग कारागीरांना संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २०२५ या  वर्षाचा संत कबीर पुरस्कार ओडिशाच्या राम मेहेर, आसामच्या रुणिमा चौधरी, उत्तर प्रदेशचे शाह मोहम्मद अन्सारी यांना प्रदान करण्यात आला. हातमागाची वीण भारताचा स्वातंत्र्यलढा आणि आत्मनिर्भरतेचा दृष्टिकोनाशी घट्ट जुळलेली असून हे क्षेत्र भारताची असामान्य विविधता दर्शवतं असंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**होल्ड.. बाईट - राष्ट्रपती**

देशातल्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण हातमाग विणकाम परंपरांचं स्मरण करून देणारी चार विशेष टपाल तिकिटंही या प्रसंगी जारी करण्यात आली.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं काल झालेल्या भारत-चीन सीमाविषयक बाबींवरील सल्लामसलत आणि समन्वयासाठीच्या ३६ व्या बैठकीत, भारत आणि चीनने 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीचा आढावा घेतला आणि स्पष्ट चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात ही माहिती दिली. दोन्ही बाजूंनी सीमा निश्चिती, सीमा व्यवस्थापन, यंत्रणा उभारणी आणि सीमापार सहकार्य यांच्याशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. द्विपक्षीय संबंधांच्या सर्वांगीण विकासासाठी सीमावर्ती भागात शांतता आणि सुव्यवस्था राखणं आवश्यक असल्याचं या बैठकीत अधोरेखित करण्यात आलं.

भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाचे सहसचिव सुजित घोष यांनी केलं, तर चिनी शिष्टमंडळाचं नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाच्या सीमा आणि सागरी व्यवहार विभागाच्या महासंचालक होउ यानकी यांनी केलं. सीमापार नद्यांबाबतच्या

'तज्ज्ञ-स्तरीय यंत्रणे'ची पुढील बैठक लवकरात लवकर आयोजित केली जाणार असल्याचंही या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याप्रकरणाची चौकशी न्यायालयीन देखरेखीखाली करावी तसंच या प्रकरणी एफआयआर दाखल करावा अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालायने फेटाळली. वर्मा यांनी राजीनामा देणं पुरेसं नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोकड आढळण्याच्या अपराधावर पांघरुण घालता येणार नाही, असं याचिकेत म्हटलं होतं. वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग आला होता.

<><><><>

कोरिया बॅडमिंटन मास्टर्स स्पर्धेत आज भारताच्या रक्षिता रामराज आणि अश्मिता चालिहा यांनी महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. उपांत्यपूर्व फेरीत रक्षिताने आपलीच सहकारी तन्वी शर्माचा २१-१८, १९-२१, १९-२१ असा पराभव केला. आता उपांत्य फेरीत तिचा सामना आणखी एक भारतीय खेळाडू अश्मिता चालिहा हिच्याशी होईल. अश्मिताने अव्वल मानांकित हिना अकेचीचा २०-२२, २१-१५, २१-१९ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर आजच्याच सत्रात, पुरुष दुहेरीत पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि कृष्ण प्रसाद गरग यांची जोडी उपांत्य फेरीतील स्थानासाठी मलेशियाच्या मॅन वेई चोंग आणि सोह वूई यिक या जोडीशी भिडणार आहे. दरम्यान, कोरिया मास्टर्स स्पर्धेत महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी प्रकारांमधील भारताचं आव्हान संपुष्टात आलं.

<><><><>

अमेरिकेत आयोजित 'ग्रँड चेस टूर सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ' स्पर्धा भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद याने जिंकली. उप-अंतिम फेरीत उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव्ह याच्याविरुद्ध सामना बरोबरीत

सोडवून आपलं विजेतेपद निश्चित केलं. त्याने एकूण ३५ पैकी २३ गुण मिळवून ही स्पर्धा पूर्ण केली. पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत प्रज्ञानंदने सुरुवातीपासूनच आघाडी कायम राखली होती.

**//<><><><><>//**